२५ वर्षे विश्वासार्हतेची

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २६४ * सातारा * सातारा गुरूवार दि. ७ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# महाराष्ट्रासाठी मंत्रीपदाचा फॉर्म्युला ठरला

## मोदी हेच पंतप्रधान, नितीश कुमार अन् चंद्राबाबूंना 'मोठं पॅकेज'

**नवी दिल्ली :** देशातील लोकसभा निवडणुकांमध्ये एनडीए आघाडीने बहुमताचा आकडा गाठला असून इंडिया आघाडीनेही आपण सरकार स्थापन करणार नसल्याचे म्हटले आहे. तर, आपल्याकडे स्पष्ट बहुमत असल्याने आपणच सरकार स्थापन करणार आहोत, असे भाजप नेत्यांनी म्हटलं आहे. त्यानुसार, आता भाजपच्यावतीने शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. ९ जून रोजी मोदी पंतप्रधानपदासाठी शपथ घेतील, अशी माहिती आहे. दरम्यान, मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात शिवसेना शिंदे गटाला २ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ मंत्रिपद देण्यात येणार असल्याची माहिती आहे. तर, चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांनही मोठं पॅकेज दिलं जाणार असल्याचे समजते.

बिहारमधील जनता दल युनायटेडचे प्रमुख नितीश कुमार आणि टीडीपीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांनी एनडीएनला समर्थन पत्र दिलं आहे. त्यामुळे, जवळपास मोदींच्या शपथविधीचं निश्चित झालं आहे. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रफुल्ल पटेल यांनीही आपल्या पक्षाचं समर्थन पत्र दिलं आहे. त्यामुळे एनडीए लवकरच सत्ता स्थापनेचा दावा करण्याची शक्यता आहे. सर्वाचं समर्थन आणि सह्या घेण्याचं काम सुरू भाजपाकडून सुरू आहे. विशेष म्हणजे भाजपसमवेतच्या सर्वच घटकपक्षांना मंत्रीमंडळात स्थान मिळणार आहे.

नरेंद्र मोदी यांचा शपथविधी ९ जून रोजी दिल्लीमध्ये पार पडणार आहे. ७ आणि ८ जूनला अजित पवार दिल्लीत एनडीएच्या बैठकीसाठी जाणार आहेत. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्यालाही



ते उपस्थित राहणार असल्याची माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, आज दिल्लीमध्ये एनडीएची सत्तास्थापनेसाठी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांनी हजेरी लावली.

**मोदींच्या पंतप्रधानपदाची हॅटट्रीक**

लोकसभा निवडणुकीत एनडीएने २९२ जागा जिंकून बहुमताचा आकडा ओलांडला आहे, त्यामुळे ते लगेचच सत्त-ास्थापनेचा दावा करणार आहेत. त्यानंतर नरेंद्र मोदी ९ जून रोजी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेण्याची शक्यता आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मोदींचा पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचा राजीनामा स्वीकारला. नरेंद्र मोदी सध्या काळजीवाहू पंतप्रधान आहेत. दरम्यान, मोदींचा पंतप्रधान पदासाठीचा हा तिसरा शपथविधी सोहळा आहे. त्यामुळे, मोदींच्या पंतप्रधानपदाची हॅटट्रीक होत आहे.

**४ खासदारांमागे १ मंत्रीपद**

एनडीए सरकारच्या मंत्रीमंडळाचे संभाव्य जागावाटप ठरल्याची माहिती आहे. देशातील महत्त्वाचे ४ खाते भाजप स्वत:कडेच ठेवणार आहेत. तर, प्रत्येकी ४ खासदारांच्या मागे एक कॅबिनेट मंत्रीपद असा फॉर्म्युला भाजपने ठरवला आहे. त्यानुसार, नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दल पक्षाला तीन मंत्रीपद, राष्ट्रीय लोकजन शक्ती पक्ष राम विलास या पक्षाचे नेते चिराग पासवान यांच्या पक्षाला १ कॅबिनेट मंत्रीपद, बिहारमधील जितनराम मांझी यांच्या हिंदुस्थान आवामी मोर्चा पक्षाला १ कॅबिनेट मंत्री पद, तर चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षाला ४ कॅबिनेट मंत्रीपद दिली जाणार आहेत.

**शिंदेंना २ तर अजित पवारांना १ मंत्रीपद**

राज्यातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १ कॅबिनेट आणि १ राज्यमंत्री पद देण्यात येणार असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाला १ मंत्रिपद देण्यात येणार असल्याचे समजते. यासह, अनुप्रिया पटेल यांच्या अपना दल पक्षाला १ कॅबिनेट मंत्री पद, आरएलडी पक्षाचे प्रमुख जयंत चौधरी यांच्या पक्षाला एक कॅबिनेट, आणि जनसेवा पक्षाचे अध्यक्ष पवन कल्याण यांच्या पक्षालाही १ मंत्रीपद देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

# अजित पवारांचा मोठा निर्णय, युगेंद्र पवारांना पहिला झटका

**बारामती :** सुनेत्रा पवारांच्या पराभवानंतर ४८ तासांच्या आत महाराष्ट्रासह देशातले लोकसभेचे निकाल जाहीर झाले आहेत. महाराष्ट्रात महायुतीच्या अवघ्या १७ जागा आल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या ४५ पेक्षा जास्त जागा निवडून येतील असा दावा सुरुवातीला केला गेला. मात्र निवडणुकीच्या फेऱ्या आणि विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या दाव्यांनी ४५ प्लसच्या दाव्यातली हवा काढली. अजित पवार यांनी प्रतिष्ठेची केलेली बारामतीची निवडणूकही ते जिंकू शकले नाहीत. अजित पवार गटला लोकसभा निवडणुकीत रायगडचीच जागा जिंकता आली आहे. यानंतर अजित पवारांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. मात्र या निवडणुकीत त्यांना यश मिळालं नाही. मात्र निवडणुकीत त्यांना यश मिळालं नाही. यानंतर अजित पवारांनी मोठा निर्णय घेतला आहे.

**युगेंद्र पवार यांचं म्हणणं काय?**

या निर्णयाबाबत माहिती नाही. मला कुणीही अध्यक्षपदावरुन हटवलं आहे हे अधिकृतरित्या सांगितलेलं नाही. कुस्तीगीर परिषदेची बैठक झाली त्यात काहीतरी निर्णय झाला आहे. अशी माहिती माझ्याकडे आहे. असं युगेंद्र पवार यांनी एबीपी माझाला सांगितलं.

**४ जूनच्या निकालात सुनेत्रा पवारांचा पराभव**

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागला.



### अजित पवारांनी काय निर्णय घेतला?

**अजित पवारांनी बारामती तालुका कुस्तीगीर परिषदेच्या सदस्यांची बैठक बोलवली. त्यानंतर त्यांनी बारामती कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदावरुन युगेंद्र पवारांना दूर करण्याचा निर्णय घेतला. बैठकीला उपस्थित न राहिल्याचं कारण कुस्तीगीर परिषदेने दिलं. त्यानंतर अजित पवारांनी हा निर्णय घेतला. अशी माहिती समोर येते आहे. या निर्णयाबाबत युगेंद्र पवार आणि शरद पवार गट काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.**

या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे पुन्हा एकदा निवडून आल्या. सुप्रिया सुळेंचा हा सलग चौथा विजय आहे. त्यांना त्यांच्या वहिनी आणि अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांचं आव्हान होतं. मात्र सुनेत्रा पवार यांचा सुप्रिया सुळेंनी पराभव केला.

**पवार कुटुंबात कटुता**

लोकसभा निवडणुकीच्या आधी पवार कुटुंबात कटुता निर्माण झाल्याचं दिसलं. शरद पवार हे कुटुंबातल्या इतर सदस्यांना घेऊन प्रचार करत होते. अजित पवार यांनी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारांचा प्रचार केला. मतदानाच्या दिवशी ते आईबरोबर मतदानाला आले होते. आई आमच्या घरात ज्येष्ठ आहे आणि आमच्या बरोबर आहे असंही त्यांनी सांगितलं होतं. मतदानाच्या दिवशी सुप्रिया सुळेंनी अजित पवारांच्या आईची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. पवार कुटुंबातली कटुता त्यांच्याकडून कमी करण्याचा प्रयत्न सुप्रिया सुळेंनी केला होता. आता निवडणुकीचे निकाल लागताच अवघ्या ४८ तासांच्या आत युगेंद्र पवारांना कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदावरुन अजित पवारांनी हटवल्याची माहिती आहे. त्यामुळे पवार कुटुंबातला संघर्ष आणखी वाढणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# नारायण राणेंच्या विजयानंतर भाजप शिवसेनेत जुंपली

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने थेट पालकमंत्री उदय सामंत यांच्या रत्नागिरी विधानसभा मतदार संघावर दावा केला. शिवसेनेने त्यावर आक्षेप घेत, सडेतोड प्रत्युत्तर दिले. नारायण राणे यांना तिकीट मिळणे अवघड होते. शिवसेनेने माघार घेऊन प्रामाणिकपणे मदत केल्याने ते निवडून आले. त्यामुळे राणेंनी सांभाळून बोलावे, अशा शब्दांत शिवसेनेने ठणकावले.

रत्नागिरी - सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघात झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत नारायण राणे विजयी झाले. शिवसेनेच्या (ठाकरे) विनायक राऊतांचा थोड्या फरकाने त्यांनी पराभव केला. रत्नागिरीचे पालकमंत्री असलेल्या उदय सामंत यांनी निवडणुकीत मदत केली नाही. राणे अशा लोकांना माफ करत नाही, असा सूचक इशारा भाजपच्या नितेश राणे यांनी दिला.

रत्नागिरी विधानसभा मतदारसंघ भाजपचा पारंपारिक गड आहे. येत्या विधानसभेच्या निवडणुकीत तो भाजपला मिळावा, असा दावा केला. शिवसेनेने यावर जोरदार आक्षेप घेतला. त्यामुळे कोकणात भाजप आणि शिवसेनेत जुंपली आहे.

मतदारसंघ कुणाला सोडायचा, कोण उमेदवार असेल हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपमधून देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीकडून अजित पवार ठरवतील. लोकशाहीत कोणालाही कुठलाही मतदारसंघ मागण्याचा अधिकार आहे. निर्णय नेतेमंडळी घेतात. महायुतीमधील एक जबाबदार मंत्री असल्याने यातून वाद वाढवायचा नाही.

राणेंच्या मताचा मी आदर करतो, असे म्हणत उदय सामंत यांनी निलेश राणेंना प्रत्युत्तर दिले. तसेच मी प्रामाणिकपणे काम करतो. त्यामुळे मला कोणाच्याही सर्टिफिकेटची आवश्यकता नाही, असे ठणकावले.

नारायण राणे यांना उमेदवारी मिळावी, यासाठी शिवसेनेने किरण सामंत यांची मनधरणी केली. राणे यांना यामुळे तिकीट मिळाले. तसेच राणे यांच्यासाठी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी रात्रोंदिवस मेहनत केली.

विनायक राऊत यामुळे पराभूत झाले. परंतु, राणेंकडून जाणीवपूर्वक महायुतीतील वातावरण बिघडवत आहेत, असा आरोप शिवसेनेचे प्रतोद भरत गोगावले यांनी केला. तसेच विधान परिषदेच्या शिक्षक, पदवीधर निवडणुकीत विचार करावा लागेल, असा इशारा गोगावले यांनी दिला.

## विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७ जूनपासून

**मुंबई :** विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन येत्या २७ जूनपासून सुरू होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने तशी शिफारस गुरुवारी राज्यपालांना पाठवली आहे. यापूर्वी १० जूनपासून हे अधिवेशन सुरू होणार होते. मात्र, लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि त्यानंतरच्या इतर घडामोडी, तसेच विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता, हे अधिवेशन २७ जूनपासून घेण्याबाबतची शिफारस मंत्रिमंडळाने केली आहे. लोकसभेच्या आचारसंहितेनंतर राज्य मंत्रिमंडळाची पहिली बैठक गुरुवारी पार पडली.-

लोकसभेनंतर आता विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारीअखेरीस राज्याचे अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडले होते. अधिवेशन संस्थगित करताना पुढील पावसाळी अधिवेशन १० जून रोजी होणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, लोकसभा निवडणूक संपली असली तरी २६ जून रोजी विधान परिषदेची मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक, तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ, अशा ४ जागांकरिता निवडणूक होत आहे.या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या विभागात आचारसंहिता कायम आहे. आचारसंहिता असताना अधिवेशनादरम्यान सरकारला कोणतीही नवी घोषणा किंवा निर्णय जाहीर करता येत नाहीत.



# नितीश कुमार यांचा मोदींना मोजकाच पण मोलाचा सल्ला

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत अनपेक्षित यश मिळाल्याने काँग्रेस आणि इंडिया आघाडीत उत्साहाचे वातावरण असून त्यांच्याकडूनही सरकार स्थापनेची चाचपणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर बिहारचे मुख्यमंत्री आणि संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घाई करा, एवढ्या केवळ दोन शब्दात मोजकाच पण मोलाचा सल्ला दिला आहे.

भारतीय जनता पक्षाकडून या लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला जात होता. या निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर देशातील विरोधी पक्ष नेस्तनाबूत होऊन जाईल, अशी मल्लिनाथ ही भाजपच्या अनेक नेत्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान केली. मात्र, देशातील जनतेने या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांचा नक्षा उतरवला आहे.

या निवडणुकीत भाजपला एकट्याला बहुमत प्राप्त करता आले नसले तरीही राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांचा आकडा बहुमतापलीकडे गेला आहे. मात्र इंडिया आघाडीनेही २३४ जागांवर विजय मिळवत उल्लेखनीय कामगिरी पार पाडली आहे निवडणूक निकालानंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत इंडिया आघाडीने सत्ता स्थापनेचा दावा न करता विरोधात बसणे पसंत केले असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही अखेरच्या क्षणी राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी असलेल्या २१ पक्षांपैकी काही पक्षांना आपल्याकडे ओढून घेऊन सत्ता स्थापन करण्याचा डाव इंडिया आघाडीकडून खेळायला जाऊ शकतो, असेच सुरुवातीला इंडिया आघाडी स्थापन करण्यात पुढाकार घेतलेले आणि कालांतराने भाजपच्या वळचणीला जाऊन बसलेले नितीश कुमार यांनी सूचित केले आहे. त्यामुळेच सरकार स्थापन करण्यात विलंब लागू नये, अन्यथा दगाफटका होण्याची शक्यता आहे, असाच त्यांनी पंतप्रधान मोदी यांना दिलेल्या, घाई करा, या सल्ल्याचा गर्भित अर्थ आहे.

## इकडं नव्या खासदारांना मुख्यमंत्र्यांकडून सूचना

# अन् तिकडं खासदार श्रीकांत शिंदेंच्या खांद्यावर मोठी जबाबदारी!

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गटाने १५ पैकी सात जागा जिंकल्या आहेत. यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव आणि कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या खांद्यावर नवी जबाबदारी देण्यात आली आहे. संसदेत शिवसेना गटनेते म्हणून श्रीकांत शिंदे यांच्या नावावर खासदारांनी एकमत केलं आहे. उद्या (७ जून) खासदारांच्या बैठकीनंतर हा निर्णय जाहीर केला जाणार आहे. दिल्लीमध्ये एनडीए खासदारांची बैठक होणार आहे.

इंडिया आघाडीतील कोणत्याही नेत्याच्या संपर्कात न राहण्याच्या सूचना

दरम्यान, आज (६ जून) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या नव्या खासदारांची बैठक घेत खासदारांचे अभिनंदन केले. तसेच इंडिया आघाडीतील कोणत्याही नेत्याच्या संपर्कात न राहण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या खासदारांना दिल्या आहेत. बैठक वर्षा बंगल्यावर पार पडली. या बैठकीमध्येच खासदारांना



सूचना देण्यात आला. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज दिल्लीला परवाना होणार आहेत. तत्पूर्वी, शिवसेनेच्या नवनिर्वाचित खासदारांसाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी खासदारांचं अभिनंदन केले.

मित्र पक्षांना काय मिळणार?

या स्नेह भोजनासाठी डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्यासह नरेश मस्के, प्रतापराव जाधव, खासदार संदीपान भुमरे, धैर्यशील माने खासदार रवींद्र वायकर खासदार श्रीरंग बारणे माजी खासदार संजय मंडलिक राहुल शेवाळे कृपाल तुमाने आमदार शीर्ष संजय शिरसाठ शिवसेना संजीव संजय मोरे उपस्थित होते. दरम्यान, एनडीए सरकार स्थापनेसाठी दिल्लीमध्ये हालचाली सुरू असतानाच मित्र पक्षांना काय मिळणार? याची सुद्धा चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, एनडीएमध्ये एकनाथ शिंदे यांचे सात खासदार सुद्धा महत्त्वपूर्ण आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिवसेनेला दोन राज्यमंत्री एक केंद्रीय मंत्रीपद मिळण्याची शकते.

मंत्रिपदासाठी प्रतापराव जाधव यांचे नाव सुद्धा आघाडीवर असून धैर्यशील माने यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. दुसरीकडे दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाने सात जागांवर विजय मिळवला आहे. बुलढाणा, औरंगाबाद, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर पश्चिम मावळ आणि हातकलंगले या मतदारसंघांमध्ये शिव-सेना शिंदे गटाकडून विजय मिळवला आहे. मुंबई उत्तर पश्चिम मधून रवींद्र वायकर अवघ्या ४८ मतांनी विजयी झाले आहेत. सर्वाधिक मताधिक घेण्यात श्रीकांत शिंदे यांचा समावेश आहे. ते दोन लाख ९१४४ मतांनी विजयी झालेय. औरंगाबादचे संदिपान भुमरे हे एक लाख ३४ हजार ६५० मतांनी विजयी झाले.

## संपादकीय

# जनादेश-पक्षादेश!

'तुमच्याकडे देशाचे नेतृत्व देणार नाही, पण तुम्ही तुल्यबळ विरोधी पक्षाची जागा भरून काढा' हा जनादेश स्वीकारण्याची शहाणीव इंडिया आघाडीने दाखवली.

दोन परस्परविरोधी राजकीय विचारधारेतील पक्ष आणि व्यक्ती यांच्याकडून एकाच दिवशी, एकाच वेळी दोन शहाणे निर्णय घेतले जाण्याचा अनुभव भारतीयांसाठी तसा दुर्मीळ. तो बुधवार, ५ जून या एकाच दिवसात आला. यातील पहिला शहाणा निर्णय राजधानी दिल्लीत घेतला गेला तर दुसरा देशाच्या आर्थिक राज-धानी मुंबईत. यातील पहिल्या निर्णयाचे महत्त्व अधिक कारण त्यात एकापेक्षा अधिक व्यक्ती होत्या आणि अनेक राजकीय पक्ष त्यात सहभागी होते. हा निर्णय 'इंडिया' आघाडीचा होता आणि दुसरा भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यासाठी 'इंडिया' आघाडी आणि देवेंद्र फडणवीस हे दोघेही अभिनंदनास पात्र ठरतात. या दोन्ही निर्णयांचे परिणाम तात्कालिक आणि दूरगामी असे दोनही पातळ्यांवर होणार असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.

प्रथम 'इंडिया' आघाडीविषयी. या आघाडीने सत्ता स्थापनेसाठी दावा न करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत योग्य, स्तुत्य आणि खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी ठरतो. या निवडणुकीतील जनादेशाचा खरा अर्थ समजून घेण्याचे शहाणपण या आघाडीतील ज्येष्ठांनी दाखवले ही खरोखरच कौतुकाची बाब. निवडणूकपूर्वकालीन उन्माद आणि केंद्रीय सत्ताधाऱ्यांतील ज्येष्ठांनी प्रचारात गाठलेली हीन पातळी लक्षात घेता संतापापोटी या आघाडीने सत्तास्थापनेसाठी दावा करणे एक वेळ राजकीयदृष्ट्या समर्थनीय ठरलेही असते. पण तसे केले असते तर त्यातून मुत्सद्दीपणाचा अभाव दिसून आला असता. तो धोका या आघाडीतील सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, सीताराम येचुरी आदींनी टाळला. म्हणून त्यांचे अभिनंदन. याचे कारण असे की या निवडणुकीचा जनादेश नरेंद्र मोदी यांच्याविरोधात असला तरी 'इंडिया' आघाडीच्या बाजूने निश्चित नाही. उन्मादी, स्वत:स परमेश्वराचा अवतार मानण्यापर्यंत विवेकाच्या पातळीवर घसरलेल्या सत्ताधीशांस भानावर आणणे हे या निवडणुकीचे उद्दिष्ट होते आणि तोच 'इंडिया' आघाडीच्या अस्तित्वाचा अर्थ होता. तो समजावून देण्याचे काम या आघाडीने चोख बजावले. खरे तर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप हा अन्य कोणत्याही राजकीय पक्षांइतकाच गुणदोषांनी भरलेला पक्ष. पण त्या पक्षाचे नेतृत्व स्वत:स अपौरुषेय मानू लागले होते. अशा वेळी तो पक्ष आणि विशेषत: पक्षनेतृत्व यांचेही पाय अन्य मर्त्य मानवांप्रमाणेच मातीचे आहेत हे दाखवून देण्याची नितांत गरज होती. ती 'इंडिया' आघाडीने उत्तमपणे पार पाडली.

तथापि ही जबाबदारी पार पाडणे म्हणजे विजय नव्हे. या आघाडीस निर्विवाद बहुमत मिळाले असते तर अर्थातच त्यास विजय मानावेच लागले असते. तसे झालेले नाही. त्यामुळे लागलेल्या निकालाचा रास्त अर्थ या आघाडीने लक्षात घेणे आवश्यक होते. तो घेण्याइतका प्रामाणिकपणा या आघाडीने दाखवला. या निकालाचा अर्थ देशास सक्षम, तुल्यबळ विरोधी पक्षाची गरज दाखवून देतो. ती गरज ही आघाडी पूर्णपणे भागवते. पण ती सत्ता राबवण्याइतकी 'वयात' आलेली नाही, हा अर्थही या जनमतातून दिसतो. तरुण-तरुणीने विवाह करण्यासाठी कायदेशीर वयाचा टप्पा गाठला याचा अर्थ त्यांनी लगेच बोहल्यावर चढावे असा खचितच नसतो. तद्वत 'इंडिया' आघाडीने या निवडणुकीत सत्तास्वयंवरास आवश्यक वयाचा टप्पा गाठला. पण विवाहोत्तर दीर्घकालीन स्थैर्यासाठी ज्याप्रमाणे उभयतांत शारीरिक क्षमतेपलीकडे आर्थिक/ सामाजिक आदी आघाड्यांवर सौहार्द निर्माण व्हावे लागते त्याप्रमाणे 'इंडिया' आघाडीस या गुणांची जोपासना आधी आपल्यात करावी लागेल. याअभावी सत्तास्थापनेचे दु:साहस घडले असते तर राजकीयदृष्ट्या अनुदार, असहिष्णू आणि आक्रमक भाजपने हे सरकार पाडण्यासाठी जंगजंग पछाडले असते आणि त्यात यशस्वी ठरल्यानंतर पुढची ५० वर्षे एकपक्षीय, एकांगी आणि एककल्ली राजवटीचा वरवंटा देशावर फिरवला असता. तो धोका 'इंडिया' आघाडीच्या निर्णयाने टळला. हाच या जनादेशाचा अर्थ होता आणि तो तसाच या आघाडीने घेतला. म्हणून ही बाब कौतुकास्पद.

दुसरा मुद्दा पक्षीय आदेशाचा. तो देवेंद्र फडणवीस यांना हवा असून त्याची जाहीर वाच्यता करण्याचे धैर्य त्यांनी अखेर एकवटले म्हणून त्यांचेही अभिनंदन. वास्तविक अडीच वर्षांपूर्वी भाजप नेतृत्वाने एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली तेव्हाही फडणवीस यांनी सरकारात सहभागी न होण्याची इच्छा जाहीरपणे व्यक्त केली होती. भाजपच्या हवेत उडत असलेल्या केंद्रीय नेतृत्वाने त्याची दखल न घेता त्यांचा जाहीर अपमान करत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली फडणवीस यांस उपमुख्यमंत्रीपद स्वीकारायला लावले. 'पाडले कोणास? पडले कोण?' या संपादकीयातून (१ जुलै २०२२) 'लोकसत्ता'ने त्यावर त्या वेळी टिप्पणी केली होती. पक्षनेतृत्वाने केलेला जाहीर अपमान फडणवीस यांनी मुकाट्याने गिळला आणि ते सरकारात सामील झाले. उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडावे ही फडणवीस यांची इच्छा होतीच. त्यासाठी आवश्यक ते उद्योग आणि उचापती त्यांनी केल्याच. पण नंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतही अशी फोडाफोड करावी यात त्यांच्यापेक्षा भाजपच्या केंद्रीय नेतृत्वास अधिक स्वारस्य होते.

आपल्या अचाट ताकदीने आपण कोणालाही पाडू शकतो, कोणालाही फोडू शकतो असा दंभ निर्माण झालेल्या भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने ही फूट स्थानिक भाजप नेतृत्वावर लादली आणि दोघांच्या सरकारांत आणखी एकास सामावून घेण्याची वेळ फडणवीस यांच्यावर आली. या राजकीय उलथापालथीत फडणवीस यांस साळसूदपणाचे प्रमाणपत्र देण्याची अजिबात गरज नाही, हे खरे. परंतु म्हणून न केलेले पापही त्यांच्या माथी मारण्याची गरज नाही, हेही तितकेच खरे. शिंदे यांना फोडण्यातून २०१९ साली साथ सोडणाऱ्या शिवसेनेस कथित 'धडा शिकवणे' ही भाजपची गरज होती हे वादासाठी मान्य केले तर पवार यांच्या घरात घडवून आणलेली फूट ही केवळ मदमस्त भाजपची चूष होती हेही मान्य करावे लागेल. फडणवीस यांनी ते केले होते आणि विधानसभेचा उर्वरित काळही त्यांनी हे गोड मानत असाच व्यतीत केला असता.

तथापि ताज्या लोकसभा निवडणूक निकालांनी घात केला आणि भाजपस जमिनीवर यायला लावले. या निकालाचा अर्थ सुस्पष्ट आहे. राज्यातील सत्ताधारी तिरपागडा 'तीन तिघाडा' मतदारांस अजिबात मंजूर नाही. विधानसभा निवडणुकांस तो तसाच सामोरा गेला तर हा गाडा मोडून पडणार हे जाणण्याइतके चातुर्य फडणवीस यांच्या ठायी आहे. शिवाय; एके काळच्या काँग्रेस नेतृत्वाप्रमाणेच आपल्या दिल्लीतील शीर्षस्थ नेत्यांचे वर्तन असते, हेही फडणवीस जाणतात. यशाचे श्रेय स्वत:स मिळेल याची खातरजमा करायची आणि पराजयासाठी राज्यस्तरीय नेत्यांस बळी द्यायचे हेच विद्यमान भाजप नेतृत्व करते.

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी २ हजार कोटींचा निधी द्या

## छत्रपती संभाजीराजे यांची मागणी

**अलिबाग :** छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले हे राज्याच्या अस्मितेचे प्रतिक आहेत. या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने २ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी छत्रपती संभाजीराजे यांनी केली. ते किल्ले रायगडावर आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्या दरम्यान बोलत होते. सरकार अनेक ठिकाणी करोडो रुपये खर्च करीत असते. आमदार खासदारही आपल्या मतदार संघात हजारो कोटींची कामे आणतात. मग गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी का निधी उपलब्ध होऊ शकत नाही. राज्यात छत्रपती शिवरायांचे ३५० हून अधिक गडकिल्ले आहेत. या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी २ हजार कोटी सरकारने द्यावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सत्तेत असलेल्या आणि नसलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि कर्तृत्व जगभरात पोहोचण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. यावर्षी अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

त्याला तमाम शिवभक्तांच्यावतीने आपल्याला निमंत्रित करण्यात आल्याची माहिती छत्रपती संभाजीराजे यांनी यावेळी दिली. किल्ले रायगडच्या या प्रतिकूल परिस्थितीत लाखोंच्या संख्येने शिवभक्त गडावर येत असतात. मिळेल त्या वा-हनाने, सायकलवरुन, काहीजण चालत या शिवराज्याभिषेक सोहोळयाला येतात. इतके प्रेम जगात कोणाला कुठेही पहायला मिळत नाही, हे प्रेम ज्यांनी आपल्यासाठी स्वराज्य स्थापन केले,



त्या शिवछत्रपती शिवाजी महाराजांसाठीच पहायला मिळते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:साठी राज्याभिषेक केला नाही, तर हे स्वराज्य जनतेसाठी निर्माण केले. अन्यायाच्या विरोधात लढा देण्यासाठी, न्यायाची भूमिका घेण्यासाठी महाराजांनी स्वराज्य निर्माण केलं असेही ते म्हणाले. या शिवराज्याभिषेक सोहळ्यास युवराज शहाजीराजे, युवराज्ञी संयोगिता राजे, खा.ओमराजे निंबाळकर, आ. रोहित पवार, माजी आ. अनिकेत तटकरे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज देहूचे प्रशांत महाराज, शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे अध्यक्ष संदीप खांडेकर, माजी अध्यक्ष फत्तेसिंह सावंत, शिवव्याख्याते यशवंत गोसावी, संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड उपस्थित होते.

# टेंभुर्णीत शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

**टेंभुर्णी :** मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने टेंभुर्णी येथे ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिव-ाजी महाराज यांच्या प्रतिमेला दुधाभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय जिजाऊ जय शिवराय,अशा जयघोषाने यावेळी परिसर दुमदुमून गेला होता.यावेळी मोठ्या संख्येने टेंभुर्णी व माढा तालुक्यातील शिवप्रेमी जमा झाले होते. संत तुकोबाराय साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष नागनाथ महाडिक यांनी शिवराज्याभिषेक दिनाविषयी माहिती सांगितली.



या सोहळ्यास टेंभुर्णीचे सरपंच प्रतिनिधी,भाजपा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे,उपसरपंच सतीश नेवसे,ब्रिगेडचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिनेश जगदाळे, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, जिल्हा संघटक विजयकुमार परबत, शिवसेना (णइढ) तालुकाप्रमुख मधुकर देशमुख,,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रतिनिधी धनंजय मोरे,गोरख देशमुख, राहुल टिपाले,माजी सरपंच प्रमोद कुटे, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, विलास कोठावळे,प्रताप काळे,संतोष खटके, मनोज काळे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अविनाश पाटील,कार्याध्यक्ष सतिश चांदगुडे,शहराध्यक्ष सचिन खुळे, सापटणे टें चे उपसरपंच अमोल ढवळे,ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब ढगे,आप्पा हवालदार, गौतम कांबळे, विजय कोकाटे, मयुर काळे, बाळासाहेब बारवे, अरूण जगताप, कुर्डूवाडी शहराध्यक्ष सचिन महिंगडे, शिवसेवक नागनाथ महाडिक, कामगार आघाडी तालुकाध्यक्ष अजय गायकवाड, शहर उपाध्यक्ष योगेश मुळे, राजाभाऊ व्यवहारे, विजय काळे, डि.के.देशमुख, मिठू देशमुख, शिवाजीराव येवले-पाटील, संजय देशमुख, अजित कोठावळे, नवनाथ मुळे, सौरभ डोके, अण्णा रेडे, संजय डोके, तेजस बोराटे, अमर साळुंखे, गहिनीनाथ सोले, भैय्या मिस्कीन, संजय घाडगे, शरद लिगाडे, गणेश गोफणे, भैय्या देशमुख, भारत जगताप, धिरज पाटील, अविनाश धोत्रे, प्रकाश जाधव,दिलीप केचे, हरिभाऊ देशमुख, गजेंद्र देशमुख, पत्रकार सदाशिव पवार,अनिल जगताप, संतोष वाघमारे उपस्थित होते.

# केंद्रीय नेतृत्वाकडून कारवाई होण्याआधीच राजीनामा देण्याचे फडणविसांचे नाटक

## काँग्रेसची टीका



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीत ४०० पार चा नारा देत निवडणुक लढवली तर महाराष्ट्रात ४५ जागा जिंकणार असा भाजपाचा अहंभाव होता परंतु देशातील जनतेप्रमाणे राज्यातील जनतेनेही भाजपाला त्यांची जागा दाखवून दिली आहे. महाराष्ट्रात भाजपाची कामगिरी अत्यंत खराब झालेली आहे याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाणीव झाली, आता केंद्रीय नेतृत्वाकडून कारवाई होण्याआधीच राजीनामा देण्याचे नाटक ते करत आहेत, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

सत्तेच्या जबाबदारीतून मुक्त करा, या देवेंद्र फडणवीस यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे पुढे म्हणाले की, राज्यात असंवैधानिक सरकार चालवत आहे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच सांगितले आहे. मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन म्हणत दोन पक्ष फोडून आलो हेही फडणवीस यांनीच जाहीरपणे सांगितले आहे. सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हिरावून मित्रांना दिले व त्या पक्षाचे चिन्हही काढून घेतले. भारतीय जनता पक्षाने सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून हे पक्षफोडीचे जे राजकरण केले ते महाराष्ट्रातील जनतेला आवडले नाही. भाजपा व देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात जनतेमध्ये प्रचंड संताप होता आणि निवडणुकीची संधी मिळताच जनतेने देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पक्षाला धडा शिकवला आणि शरद पवार व उद्धव ठाकरे ह्यांचेच पक्ष खरे आहेत व पक्षाचे नेतेही, व चिन्हही त्यांचेच आहे हे दाखवून दिले.

भाजपाच्या पराभवाची जबादारी घेऊन देवेंद्र फडणवीस राजीनामा देत असतील तर खरी जबाबदारी तर नरेंद्र मोदी यांनी घेऊन राजीनामा द्यायला हवा कारण भाजपाने लोकसभा निवडणुक ही नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावरच लढवली आहे. देवेंद्र फडणवीस राजीनामा देऊन सत्तेतून बाहेर पडत असतील पण नरेंद्र मोदी राजीनामा देणार का? हा खरा प्रश्न आहे, असेही अतुल लोंढे म्हणाले.

# इतिहासात फडणवीस यांचे नाव काळ्याकुट्ट अक्षरात: संजय राऊत

**मुंबई :** देवेंद्र फडणवीस हा नेता दिल्लीत जाऊन देशासाठी मोठे काम करेल, अशी आमची अपेक्षा होती. प्रत्यक्षात फडणवीस यांनी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राची राजकीय संस्कृती रसातळाला नेली असून त्यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात काळ्याकुट्ट अक्षरांनी लिहिले जाईल, अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली.

हे तर भाजपमधील पुरुष आनंदीबाई

पेशवाईत ध चा मा करणाऱ्या आनंदीबाई ज्या कारणासाठी प्रसिद्ध आहे त्याच कारणासाठी देवेंद्र फडणवीस प्रसिद्ध होत आहेत. फडणवीस म्हणजे भाजपा मधील पुरुष आनंदीबाई आहेत. त्यांनी राज्यात सूडाचे राजकारण केले. मात्र, त्यांनी जे दोन पक्ष फोडले त्याच शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी फडणवीस यांच्यावर रडण्याची पाळी आणली आहे, असेही राऊत म्हणाले.

**विधानसभेला १८० ते १८५ जागा जिंकू**

महाराष्ट्रात पुढील सहा महिन्यात विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची कामगिरी या लोकसभा निवडणुकीतील कामगिरी पेक्षाही उंचावलेली असेल. विधानसभेच्या तब्बल १८० ते १८५ जागांवर महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी ठरेल, असा दावा संजय राऊत यांनी केला. या लोकसभा निवडणुकीच्या कामगिरीचा विधानसभा मतदारसंघ निहाय विचार केला असता महाविकास आघाडीला १२५ विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळाली आहे. मात्र, या लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर करण्यात आला. विधानसभा निवडणुकीचे शक्य होणार नाही. त्यामुळे विधानसभेच्या अधिक जागा आम्ही जिंकू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



# कुदळवाडीत रबर मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला भीषण आग; करोडोंचं नुकसान

**बद्रीनारायण घुगे**

**पुणे :** पिंपरी चिंचवड शहरातील कुदळवाडी परिसरात आज सकाळच्या दरम्यान पुन्हा एका रबर मॅन्युफॅक्चरिंग करणाऱ्या कंपनीला भीषण आग ला-गली. या आगीमध्ये शेजारी असणाऱ्या तीन कंपन्या जळून खाक झाल्या आहेत. ही आग आटोक्यात आली असून सध्या कुलिंग ऑपरेशन सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुदळवाडी परिसरातील आर के ट्रेडर्स मॅन्युफॅक्चरिंग आणि तिच्या शेजारी असणाऱ्या अन्य दोन कंपन्यांना भीषण आग लागली आहे. आज गुरुवार असल्याने कंपन्यामध्ये कोणतेही कर्मचारी नसल्यामुळे मोठी जीवित हानी टळली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अग्निशमन दलाच्या ८ बंबांच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले आहे. मात्र आगे मध्ये कंपन्यांचे करोडोचे नुकसान झाले आहे.

या तिन्ही कंपन्यामध्ये रबरचे मटेरियल बनत असल्यामुळे आग नियंत्रणात आणण्यासाठी मोठ्या शर्तीचे प्रयत्न करावे लागत आहेत. आगीमुळे सगळीकडे धुराचे लोट पसरले होते. काही प्रमाणात परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झाले होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिन उत्साहात

**वळती :** तालुक्यातील वळती येथे गुरुवार (दि.६ ) सकाळी १० वा . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळा दिना निमत्त गावातीलच प्रवेशद्वारावरील अश्वारूढ स्मारकाचे पूजन करून, पुष्पहार अर्पण करून राज्यभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .तसेच ग्रामपंचायत कार्यालयावर विजयाची गुढी उभारण्यात आली . यावेळी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी, जय शिवाजी' ह्या घोषणा देऊन मान वंदना देण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( शरद पवार गट ) धोंडीभाऊ भोर , खरेदीविक्री संघाचे संचालक बाळासाहेब बोऱ्हाडे , सरपंच आनंद वाव्हळ , ऊपसरपंच तेजस भोर , ग्रामसेवक ज्योती वेताळ , वामन वाळुंज , गणपत लोंढे , निलेश भोर , तबाजी लोखंडे , बन्सी अजाब , बाबाजी भोर , शिवाजी भोर , संजय लोखंडे , गणेश खुडे , कमलेश शेवाळे आदी उपस्थित होते .



# कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा : विधानसभेत आवाज उठविणार वडेट्टीवार यांचा इशारा

**मुंबई :** कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा समोर आला आहे. नॅनो डीएपी व नॅनो युरीया, मेटाल्डीहाईड किटकनाशकाची तीप्पट दराने खरेदी सुरू असल्याची माहिती आहे. या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या भ्रष्टाचाराला कोणाचा आशिर्वाद आहे असा संतप्त सवाल. वडेट्टीवार यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीची मागणी करत याबाबत विधानसभेत आवाज उठविणार असल्याचा इशारा विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे.

. वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नॅनो डीएपी व नॅनो युरीया खते तयार करत नाही. त्यामुळे ही खते इफको कंपनीकडून कृषी आयुक्तालय थेट खरेदी करुन शेतकऱ्यांना त्याचे वाटप शकते. तरीही कृषी आयुक्तालयाने हा निधी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. यांना वितरीत केला आहे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मेटाल्डीहाईड या किटकनाशकाची निर्मिती करत नाही. त्यामुळे या निविदांसाठी उ्द्दढ प्रणाली राबविण्याचे शासनाचे सक्त आदेश आहेत. तरीही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाला निधी वितरीत करून महामंडळाच्या मध्यस्थीमार्फत किटकनाशक विकत घेऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जात आहे. ही दोन्ही प्रकरणे गंभीर असून या प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांना खत्रऋउज ब्रँडचे नॅनो डीएपी व नॅनो युरीया अनुदानावर वाटप करण्यासाठी अनुक्रमे रू ११५.४९ कोटी रू.४३.३० कोटी असे एकूण रू. १५८.७९ कोटी शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना मेटाल्डीहाईड किटकनाशक वाटप करण्यासाठी २,५०,००० कीलो पोटी रू.२५.१५ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

खरेदीसाठी महामंडळाला शासनाकडून डव्हान्स प्राप्त झाले असता ३% सेवा शुल्क आकारण्यात येत होते, परंतु या बाबतीत महामंडळ १३% ते १३.२५% टक्के सेवा शुल्क आकारत आहे ही बाब अत्यंत चुकीची आहे. या प्रक्रिया बेकायदेशीर असल्याने तात्काळ रद्द कराव्यात. या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही . वडेट्टीवार यांनी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्हीं. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# विशाल पाटील काँग्रेस सोबतच



मी महाविकास आघाडीचा उमेदवार, यापुढे काँग्रेस पक्ष माझ्याबाबतीत काय निर्णय घेईल त्या धोरणानुसार माझी पुढील वाटचाल असेल , माझ्या बाबतीत काँग्रेस पक्ष काय निर्णय घेईल त्याच्याशी मी बांधील असणार आहे. माझ्यासाठी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी काम केले त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. अँड प्रकाश आंबेडकर, विलासराव जगताप अजीतराव घोरपडे, जयश्री पाटील यांच्यासह अनिल बाबर यांचे कार्यकर्ते, विटा व मिरजेतील नगरसेवक यांच्यासह सर्वच पक्षाने माझ्यासाठी प्रयत्न केला आहे. त्याचे मी आभारी आहे.

- विशाल पाटील, खासदार सांगली लोकसभा

**सांगली :** सांगली लोकसभा मतदार संघात यावेळी महविकास आघाडीच्या जगावतपात राजकारण झाल्याने काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष असणारे विशाल पाटील यांना अपक्ष लढावे लागले, या लढाईत त्यांनी विजय मिळवला आहे. निवडणुकीपूर्वी त्यांना राज्यसभेची ऑफर होती, शिवाय आताही त्यांना एनडीए सोबत जाण्याचा मार्ग असताना त्यांनी मतदारांना दिलेला शब्द पाळण्यासाठी काँग्रेसला अधिकृत पाठींबा दिला आहे.

गुरुवारी दिल्लीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेऊन त्यांनी इंडिया आघाडीत राहून काँग्रेस सोबतच राहण्याचा निर्णय घेतला, त्याबाबत पाठींबा देणारे पत्र त्यांनी खर्गे यांच्याकडे सुपूर्त केले. यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री डॉ.विश्वजीत कदम उपस्थित होते.

# रोहिणी नक्षत्राची सोलापुरात बरसात; जिल्ह्यात ८२ मंडळांत पडला पाऊस



**सोलापूर :** रोहिणी नक्षत्राने जिल्ह्यात पावसाने चांगली सुरुवात झाली आहे. ९१ पैकी ८२ महसुली मंडळांत ५ मि.मी.पेक्षा अधिक पाऊस पडला आहे. उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ व करमाळ्यात पावसाने चांगली हजेरी लावल्याचे दिसत आहे.

यंदा जिल्ह्यात पावसाला लवकरच सुरुवात झाली आहे. रोहिणी नक्षत्राने यंदा सुरुवात चांगली झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जिल्ह्यात मागील दोन दिवसांत तीन- चार मंडळ वगळता इतर मंडळांत पाऊस पडला. मात्र, चार- पाच मंडळांत ५ मि.मी. पेक्षा कमी पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील ९१ पैकी ९ मंडळांत ५ मि.मी.पेक्षा कमी, तर इतर मंडळांत त्यापेक्षा अधिक पाऊस पडला आहे.

जिल्ह्यातील उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ व करमाळा तालुक्यात सर्वाधिक पाऊस पडला आहे. उत्तर तालुक्यातील पाच मंडळांत ६० मि.मी. म्हणजे जून महिन्याच्या सरासरी पावसाच्या ५२ टक्के इतका, दक्षिण तालुक्यात २६ मि.मी. म्हणजे २८ टक्के, अक्कलकोट तालुक्यात ३२ मि.मी. म्हणजे जून महिन्याच्या ३१ टक्के, मोहोळ तालुक्यात ५१ मि.मी. ५६ टक्के, तर करमाळ्यात ५३ मि.मी. म्हणजे ५३ टक्के पाऊस पडला आहे.

**मार्डी मंडळात सर्वाधिक पाऊस**

जिल्ह्यात मंगळवार व बुधवारी सलग दोन दिवस पाऊस पडला आहे. मार्डी मंडळात जिल्ह्यात सर्वाधिक ११६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. त्यानंतर सोलापूर मंडळात ७९ मि.मी., वडाळा मंडळात ४९ मि.मी., मुस्ती मंडळात ४४ मि.मी., तर मंद्रूप मंडळात ४२ मि.मी. पाऊस दोन दिवसांत पडला आहे. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी १०२.५ मि.मी. पाऊस पडणे अपेक्षित आहे. आतापर्यंत ३०.७ मि.मी. पाऊस पडला असून जवळपास ३० टक्के इतका पाऊस ५ जूनपर्यंत पडला आहे. मृग नक्षत्र शनिवार दिनांक ८ जून रोजी निघणार असून वाहन कोल्हा आहे. शुक्रवारच्या उत्तर रात्री म्हणजे शनिवारी मृग नक्षत्राला सुरुवात होणार आहे.

# दहावी, बारावीनंतर पुढे काय?

## अविनाश धर्माधिकारी यांचे शनिवारी पिंपरीत मार्गदर्शन

**भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने आयोजन**

पिंपरी : पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पिंपरीतील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात शनिवारी (दि. ८) सकाळी दहा वाजता दहावी व बारावीनंतर काय? या करिअर मार्गदर्शन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये देशातील प्रख्यात एमपीएससी व युपीएससी स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करणारे व्याख्याते, चाणक्य मंडल परिवारचे संस्थापक संचालक व निवृत्त आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी हे दहावी आणि बारावी नंतरचे करिअर, व्यक्तिमत्व विकास आणि स्पर्धा परीक्षांवर पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

दहावी आणि बारावीचा निकाल नुकताच लागला आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांचे आयुष्याचे करिअर ठरविणारा टप्पा असतो. या परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आता विविध अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची प्रक्रिया पार पाडत आहेत. अशा वेळी विद्यार्थ्यांना करिअरबाबत योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना पुढे आपण कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे असा मोठा गहन प्रश्न उभा राहिलेला असतो, अशा विद्यार्थ्यांना नेमके काय करायचे आहे, हे समजत नसल्याने गोंधळलेले असतात. अशात अनेक जण आपल्या मित्राने अमूक क्षेत्र निवडले म्हणून आपणही तेच करू किंवा स्वतः कोणताही विचार न करता घरचे सांगतील त्या क्षेत्राची निवड करतात. मात्र, गोंधळून किंवा इतरांचे ऐकून घेतलेल्या निर्णयांचा त्रास भविष्यात विद्यार्थ्यांना होऊ शकतो. असे होऊ नये म्हणून करिअरच्या संधीबद्दल तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून तंत्रशुद्ध मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना अधिक लाभ होईल. योग्य माहितीच्या आधाराने जाणीवपूर्वक निवडलेले करिअर केवळ विद्यार्थ्यांची बौद्धिक, नैतिक क्षमता वाढवत नाही, तर देशाची सामाजिक व आर्थिक बाजूदेखील बळकट करत असते.

दहावी आणि बारावी हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यावरच आपल्या आयुष्याला एक दिशा मिळते. पुढील आयुष्याचे यश-अपयश, स्ट्रगल, व्यक्तीचे समाजातील स्थान हे पुढील प्रवेशावर अवलंबून असते आणि याकरिताच पिंपरी-चिंचवडमधील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांना करिअरबाबत योग्य मार्गदर्शन व्हावे यासाठी चाणक्य मंडल परिवारचे संस्थापक संचालक व निवृत्त आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे करिअर मार्गदर्शन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले. अविनाश धर्माधिकारी हे विद्यार्थी व पालकांना सर्वात सामान्य करिअर ते अत्यंत दुर्मिळ करिअरची माहिती देतील. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना योग्यतेनुसार पुढील करिअर निवडण्यास मदत होईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असेल. या करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाला पिंपरी-चिंचवडमधील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शंकर जगताप



# वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी

**अकोला :** शहर व परिसरात गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावल. वाऱ्याचा जोर इतका प्रचंड होता की, अनेक भागातील वृक्ष उन्मळून पडले. त्यामुळे काही भागातील रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले होते. वाहनांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, पहिल्याच मान्सूनपूर्व पावसाने शहरात दाणादाण उडवली.

प्रचंड गर्मीने त्रस्त झालेल्या अकोलेकरांना गुरुवारी सायंकाळी आलेल्या मान्सून पूर्व पावसाने दिलासा मिळाला आहे. मात्र, अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत कडक ऊन पडले असताना अचानक ढग दाटून येण्यास सुरुवात झाली. त्यानंतर साडेपाच वाजताच्या सुमारास सोसाटाच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू झाला आणि बघता बघता मुसळधार पावसाला सुरुवात झाली. अर्धा तास पेक्षा अधिक वेळ कोसळलेल्या पावसाने शहरात सर्वत्र दाणादाण उडवली. बाजारपेठेत हातगाडीवर किरकोळ वस्तू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांच्या वस्तू पावसाने भिजल्या.

शहरातील तोष्णीवाल लेआऊट परिसरात अकोला अर्बन बँक मुख्यालयाच्या समोरील मोठा वृक्ष रस्त्यावर कोसळला. त्यामुळे या वृक्षाच्या खाली असलेल्या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शिवाय वृक्ष रस्त्यावरच पडल्यामुळे या मार्गावरची वाहतूकही बंद झाले होती. याशिवाय शहराच्या अनेक भागात झाडांच्या फांद्या रस्त्यावर पडल्याने वाहतूक बाधित झाली. शहराच्या काही भागात पाणी साचल्याने नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागला.

# दगडफेक करणाऱ्या युवकाचा ग्रामस्थांच्या हल्ल्यात मृत्यू

**वडगाव मावळ :** कामा फार्म कुसुर खांडी रस्त्यावर मद्यधुंद अवस्थेत ग्रामस्थांवर दगडफेक करणाऱ्या युवकाचा ग्रामस्थांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.५) रात्री ९:३० वा. घडली.

भाग्यश्री अनिल कांबळे (वय १९ रा. खराडी बायपास, खांदवेनगर, पुणे) यांनी वडगाव मावळ पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. गु.र.नं.२७०/२०२४ भा.द.वि. कलम- ३०२, ३२६, ३२४, ५०४, ५०६, ३४, १४३, १४७, १४८, १४९, सह शस्त्र अधिनिअम कलम ४ (२५). अन्वये वडगाव मावळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अक्षय बाबाजी जगताप (वय २६, रा. चंदननगर, पुणे) हल्ल्यात मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. अशोक तुरडे, मोहन तुरडे, सुभाष तुरडे व ०५ ते ०७ अनोळखी इसम (सर्व रा. कुसूर ता मावळ जि पुणे) यांच्या खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार , मयत अक्षय जगताप याने आरोपीचा भाऊ अंकुश तुरडे याला बुधवारी (दि. ५) रात्री ८.३० वा. कुसुर ते खांडी रोड लगत भांडण केले, मयत अक्षय जगताप याने अंकुश तुरडे यास नाकावर बुक्की मारून त्याला जखमी केल्याच्या कारणावरुन आरोपी अशोक तुरडे, मोहन तुरडे, सुभाष तुरडे इतर ०५ ते ०७ अनोळखी लोकांनी लोखंडी कोयता, लोखंडी रॉड, लाकडी दांडके व लोखंडी सळ्याच्याने अक्षय जगताप यांच्या डोक्यात व पाठीवर हातापायावर वार करून गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार डोईजड करीत आहेत. आरोपी अटक करण्यासाठी पोलीस पथक रवाना केले आहे, लवकरच आरोपींना अटक करणार असल्याचे पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी सांगितले.

## जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी १६ जणाविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा :** उचेठाण येथे ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतातील सामाईक रस्ता नांगरत असताना नांगरणीस विरोध केल्याने जातीवाचक शिवीगाळ करुन कुदळीच्या दांड्याने मारहाण करुन जखमी केल्या प्रकरणी हरिदास घोडके,संतोष कदम,संजय बेदरे, विजय बेदरे,पप्पू बेदरे, आण्णा साठे, आप्पा साठे, दादासाहेब बेदरे, प्रभाकर बेदरे, जमल बेदरे, ओंकार घोडके,वैभव घोडके,वैभव गडदे,सायाप्पा पटाप,राजू बेदरे आदीजणांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

जातीवाचक शिवीगाळ करुन आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन गळ्यातील गमछा ओढून तेथे पडलेली कुदळ उचलून हाताच्या दंडावर मारुन जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान यावेळी मित्र व भाऊ भांडण सोडविण्यास आल्यानंतर त्यांना ही मारहाण केल्याचे नमूद केले आहे. दरम्यान गुन्हा दाखल होवूनही आरोपी अद्याप मोकाट असल्याचा आरोप फिर्यादीचा आहे.



# सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा जल्लोष

**देऊळगाव राजे :** बारामती लोकसभा मतदारसंघातुन शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार खा. सुप्रिया सुळे सलग चौथ्या वेळी मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. सुळे या निवडून आल्यानंतर देऊळगाव राजे आणि परिसरातील ग्रामस्थांना कडून फटाक्याची आतषबाजी करत घोषणा देत उत्साह साजरा करण्यात आला ,यावेळी देऊळगाव राजे विकास सोसायटीचे संचालक विष्णु सुर्यवंशी ,महादेव सुर्यवंशी, चंद्रकांत पवार ,सचिन माने ,सचिन गिरमकर ,विलास आवचर ,ज्ञानदेव गिरमकर, भागवत सूर्यवंशी, चेतन औताडे ,केशव औताडे ,बन्सी इनामदार, अश्फाक इनामदार, पोपट खोसरे ,सागर तणपुरे आ. ग्रामस्थ उपस्थित होते.

**खा. सुप्रिया सुळे यांची बारामती लोकसभा मतदारसंघातून सलग चार वेळा निवड झाली आहे त्या प्रत्येक वेळी अधिक मताधिक्याने निवडून आल्या आहेत यावेळी सुप्रिया सुळे या खासदार व्हाव्यात यासाठी दौंड तालुक्याच्या पूर्व भागात सुद्धा मतदारांनी चांगली साथ दिली आहे.**

**-बाळासाहेब बागल .**

**- शरद पवार गट.**

महाराष्ट्र राज्यात भाजप कडून फोडाफोडीचे राजकारण मराठा आरक्षण या अनेक मुद्द्यावरून हे महाराष्ट्रातील जनतेला मान्य नव्हते त्यामुळे याचा रोष लोकसभा निवडणुकीमध्ये दिसून आला आणि त्याचे पडसाद ग्रामीण भागात सुद्धा दिसून आले त्यामुळे महाराष्ट्र मध्ये भाजपला चांगला फटका बसला आहे .

राज्याचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांना महाराष्ट्रातील जनतेची भावनिक साथ होती आणि त्याचा फायदा या भागातून सुप्रिया सुळे सुद्धा यांना झाला असल्याचे दिसून आले.

# अंतरवालीत महादेव जानकरांना लीड!

## जिथं जरागेंनी मराठा आंदोलन उभं केलं तिथंच ओबीसी नेता वरचढ

**मुंबई :** यंदाच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान संपूर्ण देशाचे महाराष्ट्रावर लक्ष होते. महाराष्ट्रात नेमकं कोण बाजी मारणार याची सर्वांनाच उत्सुकता होती. गेल्या दोन ते तीन वर्षांत बदलेली राजकीय परिस्थिती, शिवसेना आणि राष्ट्रवादी यासारख्या महत्त्वाच्या पक्षांची झालेली शकलं आणि ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणाला मिळालेली हवा यामुळे यावेळी निवडणुकीचे सगळे गणित बदलले होते. दरम्यान, मराठा आरक्षणाचा या निवडणुकीवर मोठा परिणाम पडणार, असं सांगितलं जात होतं. त्याचा परिणाम प्रत्यक्षात दिसला देखील. सत्ताधारी महायुतीला या मराठा आरक्षण आंदोलनाचा फटका बसला. पण ज्या ठिकाणी हे मराठा आरक्षण उभं राहिलं, जे ठिकाण मराठा आरक्षणाच्या लढ्याचं केंद्र ठरलं, त्याच अंतरवाली सराटीत मात्र ओबीसी समाजाचे नेतृत्व करणाऱ्या उमेदवाराला पसंती मिळाली आहे.

**मराठा आरक्षण आंदोलनामुळे अंतरावाली सराटीला वलय**

मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथूनच मराठा आरक्षणाचा लढा उभा केला. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, या एका मागणीसाठी ते गेल्या कित्येक महिन्यांपासून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरतायत. त्यासाठी वेळप्रसंगी त्यांनी उपोषणही केले. जरांगे यांना मराठा समाजाचा मोठा पाठिंबा मिळाला. जरांगे म्हणतील तसं आम्ही करू, अशीच मराठवाडा आणि इतर भागातील मराठ्यांची होती. त्यामुळे सरकारवरही दबाव वाढला होता. अंतरवाली सराटीत बसून मनोज जरांगे जे म्हणतील तेच आम्ही करू अशी मराठा समाजाची भूमिका होती. त्यामुळे या गावालाही तेवढेच महत्त्व आले होते. जरांगे यांना समजावून सांगण्यासाठी आमदार, खासदार, मंत्र्यांपासून ते मुख्यमंत्र्यांनाही या गावात जावे लागले. त्यामुळे या गावाला संपूर्ण राज्यात वलय निर्माण झाले होते.

**परभणीत संजय जाधव विरुद्ध महादेव जानकर**

याच कारणामुळे अंतरावाली या छोट्याशा गावातील लोकांच्या मनात काय आहे? येथील मतदार नेमकं कोणाला मतदान करणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. दरम्यान, आता लोकसभेची निवडणूक संपली आहे. अंतरावाली सराटी या गावाचा परभणी लोकसभा मतदारसंघात समावेश होतो. परभणी शहरात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संजय जाधव विरुद्ध महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्यात लढत झाली. संजय जाधव हे मराठा समाजातून येतात तर जानकर हे ओबीसी समाजाचे नेतृत्त्व करतात. अशा स्थितीत अंतरवाली सराटी हे गाव कोणाच्या पाठीशी उभे राहते, याची उत्सुकता सर्वांनाच लागली होती.आता निकाल स्पष्ट झाल्यानंतर जरांगेंनी ज्या ठिकाणी मराठा आंदोलन उभे केले त्या अंतरवालीने जानकर यांना आघाडी दिल्याचे समोर आले आहे.

**अंतरवाली सराटीत कोणाला किती मते?**

अंतरवाली सराटीमध्ये एकूण ११६० एवढं मतदान झालं होतं. यापैकी विद्यमान खासदार संजय जाधव यांना ५३१ एवढी मते मिळाली आहेत. तर महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना ६२९ एवढी मतं मिळाली. त्यामुळे जरांगेंच्या आंदोलन स्थळी ओबीसी उमेदवार असणाऱ्या महादेव जाणकरांना ९८ मतांची आघाडी मिळाली आहे. त्यामुळे अंतरावाली सराटीतील मतदारांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मतदान केल्याचं स्पष्ट झालं आहे.

# राज्यातील ११५ पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस पदक प्रदान



**मुंबई :** राज्यातील ११५ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांना राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते आज पोलीस शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

राजभवन मुंबई येथील दरबार हॉल येथे झालेल्या पदक अलंकरण सोहळ्यामध्ये २०२१ च्या स्वातंत्र्य दिनी तसेच २०२२ च्या प्रजासत्ताक दिनी जाहीर झालेली पोलीस पदके देण्यात आली.

तीस (३०) पोलीस अधिकारी व जवानांना पोलीस शौर्य पदक प्रदान करण्यात आले, तर ७ पोलीस अधिकारी व जवानांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आली. अठ्ठ्यात्तर (७८) पोलीस अधिकारी व अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदके प्रदान करण्यात आली.

पोलीस अलंकरण समारंभाला अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर तसेच पोलीस अधिकारी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व गौरविण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

विनय कारगांवकर, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, वाहतूक मुंबई, आशुतोष डुंबरे, आयुक्त ठाणे शहर, अशोक अहिरे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, नाशिक ग्रामीण, विनोदकुमार तिवारी, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर जिल्हा, प्रल्हाद खाडे, सेवानिवृत्त समादेशक, रा. रा. पो. बल - गट क्र. ६, धुळे, चंद्रकांत गुंडगे, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड व मिर्झा अन्वर बेग इब्राहिम बेग, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, नांदेड यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले.

# माढ्याचा खासदार प्रत्येकवेळी नवा; परंपरा अखंडित



## चारहीवेळा नवीन चेहरा; आता सोलापूरकरांच्या गळ्यात माळ

**सातारा :** माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक चुरशीची होऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते-पाटील भाजपवर भारी ठरले. त्यांनी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यावर मात केली. त्यामुळे प्रत्येकवेळी नवा खासदार हे माढ्याचे समीकरण कायम राहिले. तर यावेळी सोलापूरकरांच्या गळ्यात विजयाची माळ पडली असली तरी यापूर्वी पुणे आणि सातारकरही माढ्यातून खासदार झाले आहेत.

देशात २००८ मध्ये लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाली. त्यावेळी माढा मतदारसंघ अस्तित्वात आला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढा, सांगोला, करमाळा आणि माळशिरस विधानसभेचे मतदारसंघ येतात. तर सातारा जिल्ह्यातील माण आणि फलटण विधानसभा मतदारसंघांचाही समावेश होतो. २००९ मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली. या पहिल्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून पक्षाध्यक्ष शरद पवार यांना माढ्याची निवडणूक लढविण्याचा आग्रह झाला. त्यामुळे पवार माढ्यातून रिंगणात उतरले. तर विरोधात भाजपचे सुभाष देशमुख तसेच रासपचे महादेव जानकरही रिंगणात होते. त्यावेळी माढा मतदारसंघात राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. त्या तुलनेत भाजपची ताकद नगण्य होती. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे शरद पवार यांनी तब्बल ३ लाखांहून अधिक मतांनी भाजपचा पराभव केला. पवार हे पुणे जिल्ह्यातील असले तरी माढ्याचे पहिले खासदार ठरले.

२०१४ च्या निवडणुकीत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांना राष्ट्रवादीने मैदानात उतरवले. त्यावेळी राज्यात महायुती झाली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटना महायुतीचा भाग होती. त्यामुळे मतदारसंघ स्वाभिमानीला गेल्यावर सदाभाऊ खोत यांना उमेदवारी मिळाली. या निवडणुकीत खोत यांनी जोरदार टक्कर दिली. पण त्यांचा मोहिते-पाटील यांनी २५ हजार मतांनी पराभव केला. मोहिते-पाटील दुसरे खासदार ठरले. ते सोलापूर जिल्ह्यातील अकलुजचे. २०१९ ला तिसरी निवडणूक झाली. या निवडणुकीत दोघा मित्रांत लढाई झाली. भाजपने रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना, तर राष्ट्रवादीने सध्याचे करमाळ्याचे आमदार संजय शिंदे यांना उमेदवारी दिली. निवडणूक चुरशीची झाली. पण पहिल्यांदाच मतदारसंघात रणजितसिंह यांच्या रूपाने कमळ फुलले. त्यांनी शिंदे यांचा ८५ हजार मतांनी पराभव केला. रणजितसिंह हे सातारा जिल्ह्यातील फलटणचे. त्यामुळे माढ्याचा खासदार तीन निवडणुकांत वेगवेगळा झाला.

२०२४ ची माढा लोकसभेची चौथी निवडणूक होती. या निवडणुकीतही भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांत सामना झाला. भाजपने अपेक्षेप्रमाणे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मैदानात उतरवले. त्यामुळे महायुतीतील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे रामराजे नाईक-निंबाळकर आणि अकलुजचे मोहिते-पाटील नाराज झाले. त्यांनी रणजितसिंहच्या उमेदवारीला विरोध कायम ठेवला. त्यातच भाजपमध्ये असलेले धैर्यशील मोहिते-पाटील हेही इच्छुक होते. त्यांना डावलण्यात आले. त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यामुळे पाच वर्षांनंतर शरद पवार आणि मोहिते एकत्र आले. त्यातच माळशिरसमधील कट्टर विरोधक उत्तम जानकरही मोहितेंबरोबर आले. तसेच माळशिरस, करमाळा आणि माढा विधानसभा मतदारसंघांतूनही मताधिक्य मिळाले. त्यामुळे माढ्यात तुतारी वाजली आणि धैर्यशील मोहिते खासदार झाले. मोहिते यांच्यामुळे माढ्यात रणजितसिंह यांना दुसऱ्यांदा खासदार बनता आले नाही. तसेच माढा मतदारसंघाने प्रत्येकवेळी नवीन खासदार निवडून देण्याची परंपराही कायम ठेवली.

### निवडणुकीत राष्ट्रवादीचा नेहमीच नवा उमेदवार

**माढा मतदारसंघातील चौथी निवडणूकही राष्ट्रवादी आणि भाजपमध्येच झाली. आतापर्यंतच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रत्येकवेळी नवीन उमेदवार देण्यात आला आहे. यामध्ये अकलुजच्या मोहिते-पाटील घराण्यात दुसऱ्यांदा उमेदवारी मिळाली आहे. तर भाजप तसेच युतीतून पहिल्या दोन निवडणुकांत वेगवेगळे उमेदवार देण्यात आले. तर तिसऱ्या निवडणुकीत विजयी झालेले खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यावर भाजपने आताच्या चौथ्या निवडणुकीतही विश्वास दाखविला. पण, आताच्या या निवडणुकीत राजकीय समीकरणे खूप बदलली. त्यामुळे भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. रणजितसिंह यांच्या उमेदवारीला विरोध होत असताना भाजपने विचार केला असता तर या निवडणुकीतील चित्र वेगळेच असते. तसेच भाजप किंवा महायुतीला हा मतदारसंघ स्वत:कडे ठेवता आला असता हे निश्चित आहे.**



## अजित पवारांच्या बैठकीला ५ आमदारांची दांडी

### पुन्हा एकदा राजकीय भूकंप होणार?

**मुंबई -** लोकसभेचा निकाल लागताच महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात मोठ्या हालचाली सुरू झाल्यात. राज्यात ४८ पैकी ३० जागांवर विजय मिळवत महाविकास आघाडीने महायुतीला धक्का दिला आहे. त्यात अजित पवारांच्या वाट्याला केवळ १ जागाच आली आहे. त्यामुळेअजित पवारगटातील आमदारांमध्ये चलबिचल सुरू झाल्याची माहिती आहे.

ुरुवारी अजित पवारांनी त्यांच्या आमदारांची बैठक मुंबईत आयोजित केली होती. या बैठकीला ५ आमदारांनी दांडी मारल्याचं पुढे आले. त्यात अजित पवार गटातील अनेक आमदारशरद पवारांच्या संपर्कात असल्याची माहिती आहे. त्यामुळे आमदारांच्या गैरहजेरीवरून विविध तर्क वितर्क लढवले जात आहेत. ट्रायडेंट हॉटेलला ही बैठक पार पडली. त्याआधी अजित पवारांनी कोअर कमिटी सदस्यांसोबतही चर्चा केली.अजित पवारांचे अनेक आमदार शरद पवारांच्या गटात सहभागी होण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसांत या राजकीय उलथापालथी घडू शकतात. सध्या तरी महाराष्ट्रात शिंदे सरकारवर कुठलेही संकट नाही. मात्र आमदारांच्या भूमिकेनंतर हालचाली दिसून येऊ शकतात. पुढील काही महिन्यात राज्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यात लोकसभा निवडणुकीचे निकाल मविआच्या बाजूने झुकलेले आहेत. मविआत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने सर्वात कमी १० जागा लढवल्या त्यात १० पैकी ८ जागांवर दणक्यात विजय मिळवला आहे.

**बारामतीच्या पराभवामुळे अजित पवार गटात खळबळ** : अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार या बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळेंविरोधात उभ्या राहिल्या होत्या. सुप्रिया सुळेंचा पराभव करायचा या दृष्टीने महायुतीने ताकद लावली. परंतु प्रत्यक्षात सुप्रिया सुळे मोठ्या मताधिक्याने या मतदारसंघात चौथ्यांदा खासदार झाल्या त्यामुळे बारामतीतील सुनेत्रा पवारांच्या पराभवामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत खळबळ माजली आहे.

**जयंत पाटील काय म्हणाले?** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे १८ ते १९ आमदार तुमच्या पक्षाच्या संपर्कात असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. खरंच हे आमदार तुमच्या पक्षाच्या संपर्कात आहेत का? असा प्रश्न पत्रकारांकडूनजयंत पाटीलयांना विचारण्यात आला होता. त्यावर पाटील म्हणाले की, रोहित पवार यांना काही बाहेरचे आमदार संपर्क करत असतील. मात्र या विषयावर मला लगेच काही बोलायचं नाही. या आमदारांबाबत मी योग्य वेळ आल्यानंतर आपल्याला संपूर्ण माहिती देईल. तुम्हाला अंधारात ठेवून आम्ही काही करणार नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती.

## शनीजयंती निमित्त सुमारे दोन लाख भाविकांचे दर्शन

**अहमदनगर :** शनीशिंगणापूर येथे शनीजयंती निमित्त काल सुमारे दोन लाख भाविकांनी दर्शन घेतले. सकाळची आरती ऑस्ट्रेलियाचे राकेश कुमार, दुपारची आरती जयेश शहा, व सौरभ बोरा तर सायंकळी दिल्लीचे सौरभ बोथरा यांच्या हस्ते करण्यात आली. काशी येथून व दोन दिवसापूर्वी प्रवरासंगम येथून कावड धारकांनी आणलेल्या गंगाजलाची स्व.बाबुराव बानकर यांच्या निवासस्थानापासून मिरवणूक काढण्यात आली होती.

११.३० वाजता शनी आरती,विविध प्रकारची फळे, फुले, तेल अर्पण करून शानिदेवाला जल अभिषेक घालण्यात आला. यावेळी चौथरा सह मंदिर परिसरात आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. बँडपथक, आतषबाजी, मंदिर परिसरात येताच शिस्तबद्ध कावडधारकांनी चौथर्यावर जाऊन शनिदेवाला पवित्र जलाभिषेक घालून दर्शन घेतले.

शनीमहाराजांचा जयघोष करून प्रसाद वाटप करण्यात येत होते. देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर, उपाध्यक्ष विकास बानकर, सरचिटणीस आप्पासाहेब शेटे, कोषाध्यक्ष पोपटराव शेटे, नितीन शेटे व विश्वस्त मंडळ हे सुविधा निर्माण करून देत होते. पोलीस उपनरीक्षक खगेंद्र टेभेकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## जोर खोऱ्यातील बलकवडी धरणात स्थित असलेले अतिप्राचीन धूरजटेश्वर

**- शुभम गुरव, आसनगाव :** सातारा जिल्हात शंभू महादेवाची अनेक प्रकारची अतिप्राचीन मंदिर आहेत.अशाच प्रकारे वाई तालुक्यातील जोर परीसरातील गोळेवाडीपासून थोड्याच अंतरावर शंभू महादेवाचे स्वयंभू असे धूरजटेश्वराचे लिंग असून मंदिर देखील अतिप्राचीन स्वरूपात आहे.याठीकाणी धूरजटेश्वराचे स्वयंभू असे स्थान असून हे स्थान जागृत देखील आहे.

बलकवडी धरणात स्थित व जोर खोर्यात असलेले हे मंदिर नयनरम्य व आकर्षक आहे. निसर्गाला साद घालत धरणाच्या आत असलेले हे मंदिर धरणाची पाणी पातळी कमी झाली की दिसण्यास सुरुवात होते या मंदिराच्या भोवतालच्या परिसरात गाळ देखील असतो यामुळे या मंदिराला भेट देताना पाण्याची पातळी कमी होणे व गाळ सुका होणे आवश्यक आहे.

या परीसरातील आसपासची घरे स्थलांतरीत झाली असून शंभू महादेवाचे हे मंदिर आजदेखील निसर्गाला साद घालत आहे तशाच स्थितीत उभे आहे. दुर्मिळ असे असलेल्या या शंभू महादेवाच्या मंदिराला क्वचितच काहीजण भेट देत असतात.मंदिर परीसरालगतच एक वृक्ष असून हे वृक्ष वर्षानुवर्षे अजूनही धरणाच्या अगोदर त्यावेळेची साक्ष देत वटून उभे आहे .शंभू महादेवाची अनेक रूपे आहेत त्यामध्ये जोर खोर्यातील धूरजटेश्वराचे रूप देखील नयनरम्य आहे.

### मंदिराला भेट कधी द्यावी

**हे मंदिर बलकवडी धरणात स्थित असून या मंदिराला भेट देताना शक्यतो धरणातील पाणी कमी झाल्यानंतर व मंदिर परीसरातील गाळ सुकल्यानंतर या शंभू महादेवाच्या धूरजटेश्वर मंदिराला भेट द्यावी**



बलकवडी धरणात स्थित असलेले धूरजटेश्वर मंदिर (छाया: शुभम गुरव)

## अयोध्येच्या समृद्ध परंपरेचा प्रसार

**नवी दिल्ली :** दुबई, न्यूयॉर्क आणि दिल्ली एनसीआरसारख्या जगभरातील गजबजलेल्या भागात मोठमोठे समारंभ करून द हाऊस ऑफ अभिनंदन लोढाने अयोध्येत सामावलेली प्रचंड क्षमता दाखवून दिली आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक असलेल्या अयोध्येच्या उज्वल, आशावादी भविष्यात जागतिक सहभागास आमंत्रण दिले. जगभरातील भारतीयांना त्यांच्या सांस्कृतिक वारशाशी जोडण्याचे महत्त्व अधोरेखित करून या समारंभांनी जागतिक आध्यात्मिक राजधानी म्हणून अयोध्येचे स्थान आणखी मजबूत केले.

ही जागतिक चळवळ अयोध्येला जागतिक आध्यात्मिक आणि सांस्कृतिक केंद्र बनवण्याच्या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेस अनुरूप आहे. मोठमोठ्या स्थळी अयोध्येच्या समृद्ध परंपरेचा प्रसार करून द हाऊस ऑफ अभिनंदन लोढाने या शहराची लक्षणीयता आणि तेथील विकासाची क्षमता अधोरेखित केली.

या समारंभांच्या वैशिष्ट्यांमध्ये दुबई फ्रेम या जगातील सर्वात मोठ्या, १५० मीटर उंच फ्रेमवर एक आकर्षक देखावा सामील आहे. दुबई फ्रेम हे दुबईमधील एक अत्यंत प्रसिद्ध शिल्प आहे आणि भूतकाळ आणि वर्तमानातील सेतूचे ते प्रतीक आहे. त्यामुळे अयोध्येच्या परंपरेचा गौरव करण्यासाठी हे स्थान उचित होते. दुसरीकडे, न्यूयॉर्क शहरातील टाइम्स स्केअरमध्ये एक आकर्षक व्हिडिओ डिस्प्ले आणि ऑन-ग्राउंड ॲक्टिव्हेशनद्वारे भविष्याची नांदी देत अयोध्येचा वारसा न्यूयॉर्क शहराच्या थेट मध्यात आणला आणि अयोध्येचे वैभव जगभरातील लोकांना दाखवले. त्याशिवाय दिल्ली एनसीआरचे आकाश एका नेत्रदीपक ड्रोन शो ने झळकून उठले,

# कोल्हापूर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाची हजेरी, वातावरणात गारवा

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात बुधवारी दुपारपासून मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. रात्रीपर्यंत पावसाची एकसारखी भुरभुर राहिली, मान्सून सुरू झाल्यासारखेच वातावरण राहिल्याने गारवा निर्माण झाला होता. आज, गुरुवार पासूनपाऊसरोज हजेरी लावेल, असा अंदाज हवामान विभागाचा आहे.

यंदा मान्सून देव भूमीत लवकर दाखल झाला आहे. त्याचा महाराष्ट्राकडे आगेकूच करण्याचा वेग चांगला असल्याने मागील दोन दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यातील वातावरणात बदल जाणवत आहे. बुधवारी सकाळी ढगाळ वातावरण राहिले. त्यानंतर एकदम तापमानात वाढ झाली आणि अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. दुपारनंतर पुन्हा वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरण झाले, दुपारी दीड वाजता कोल्हापूर शहरात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. त्यानंतर थोडा वेळ उसंत घेतली, साडेपाच नंतर पुन्हा पावसाची भुरभुर सुरू झाली. मान्सूनच्या आगमनासारखे वातावरण राहिले. आजपासून आठ दिवस पावसाची रोज हजेरी राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



**शेतकऱ्यांची तारांबळ..**

दुपारनंतर मान्सून सुरू झाल्या सारखे वातावरण झाले. त्यात काही ठिकाणी जोरदारपाऊसकोसळला तर त्यानंतर भुरभुर सुरू झाल्याने पाऊस सुरुच झाला म्हणून शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे.

**तापमान २८ डिग्रीपर्यंत**

यंदा कमाल तापमानाने उच्चांक गाठला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या कमाल तापमानात घट झाली. बुधवारी २८ डिग्रीपर्यंत राहिले.

**कुंभी-कासारी परिसरात दीड तास मुसळधार पाऊस**

कोपार्डे : ढगाळ वातावरण असूनही दोन दिवस पावसाने हुलकावणी दिली होती. बुधवारी सकाळपासून ढगाळ वातावरण व हवेत प्रचंड उष्णता होती. कुंभी कासारी परिसरात दुपारी साडेबारा वाजता पावसाला सुरुवात झाली. जवळपास दीड तास मुसळधार पाऊस झाला.

कोल्हापूर जिल्ह्यात सर्व ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने हजारी लावली होती. कुंभी-कासारी परिसरात मात्र एक-दोन वेळा हलका पाऊस झाला होता. शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा होती. गेली दोन दिवस ढगाळ वातावरण व हवेतील उष्णता यामुळे पावसाची शक्यता वर्तवण्यात येत होती. दुपारी साडेबारा वाजता पावसाच्या हलक्या सरींना सुरवात झाली. यानंतर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जवळपास दीड तास हा पाऊस कोसळत होता. कुणबी कासारी परिसरातील शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा होती. आजच्या मुसळधार पावसाने भाताची धूळवाफ पेरणी झालेल्या क्षेत्राबरोबर ऊसाच्या पिकालाही त्याचा फायदा झाला आहे. अचानक आलेल्या मुसळधार पावसाने मात्र लोकांची तारांबळ उडाली.

**पन्हाळा तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाची दमदार एंट्री**

पोर्ले तर्फ ठाणे : पन्हाळ्यात मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. पेरणी केलेल्या भात पिकांची उगवण आणि ऊस पिकांच्या पोषक वाढीसाठी हा पाऊस उपयुक्त ठरणारा आहे. गेल्या दोन दिवसापासून तालुक्यात ढगाळ वातावरण. तर कुठे तुरळक पावसाची पडल्याने भात पेरणीसाठी शेतकऱ्यांची धांदल उडाली होती.

यंदा पाऊस चांगला लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असला तरी मान्सूनपूर्व पावसाने पेरणीच्या पूर्वसंध्येला दिलेली हुलकावणी शेतकरी चिंता वाढविणारी होती. जेथे शक्य असेल तेथील शेतकऱ्यांनी पाटाने पाणी देऊन भाताची उगवण करून घेतली आहे. तालुक्यातील डोंगर माथ्यावरील आणि माळामुरडाच्या शेतातील पेरणीस पावसाची गरज होती. त्याची उणीव बुधवारी पडलेल्या दमदार पावसाने भरून काढल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. पावसाच्या प्रतीक्षेत असणारा शेतकरी उसाला रासायनिक खताचा मिरगी डोस टाकण्यासाठी शेतकऱ्यांची धांदल उडणार आहे.

**विजांसह कडकडाटासह पावसाने हलकर्णीकरांची तारांबळ**

हलकर्णी : दुपारी तीनच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह तासभर जोरदार पावसाने हजेरी